REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# 'मराठी संतांचे ऐतिहासिक कार्य'

डॉ. हेमंत म. देशमुख
आठवले समाजकार्य महाविद्यालय, भंडारा

**सारांश –**

एकविसाव्या शतकात विज्ञानाच्या वाढत्या प्रगतीपथाच्या आलेखावर संगणक आणि मोबाईल हा जसा शोध महत्वाचा वाटतो यापूर्वीच ज्ञानेश्वरांनी अद्यात्म य विज्ञान याचे वास्तव तत्कालिन परिस्थितीत सिध्द केले ते म्हणतात –

'अद्यात्मविद्येचे दाविलेसे रुप ।
चैतन्याचा दीप उजळीला।।'

महाराष्ट्रातील जवळपास सर्वच धर्माची व संप्रदायाची धारणा अशी आहे की, चौऱ्यांशी लक्ष योनीतून भ्रमण केल्यावर नर जन्म लाभतो. म्हणून मानवाला लाभलेली 'बुध्दी' आणि 'मन' हे सुध्दा एक संगणकच आहे. ही निर्मात्याची लिलाच म्हणावी लागेल. मानव देहाचे वर्णन संत करतात तो देह कसा आहे या विषयी –

'पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्यूत सर्वकाळ' तर दुसरीकडे 'नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान' अर्थातच देह हा पवित्रच आहे परंतू कुप्रवृत्तीने नाशिवंत ही होतो. तसेच नाथांनी सर्व प्राणिमात्रात देव जाणला ते म्हणतात 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले। तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा' या अर्थाने ज्ञानेश्वराने जगाच्या कल्याणाची विश्वात्मक देवाकडे 'पसायदान' मागितले विश्वबंधूत्व, शिवकल्याण आणि विश्वशांती निर्मीतीसाठी भावार्थ दीपिका सारख्या ग्रंथातून मागणी केलेली दिसते.

अशा पध्दतीने एकुणच सर्व मराठी संतांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला जडणघडणीला, उव्दीग्न जीवाला आकार देण्याचे कार्य केलेले लक्षात येते. अठरापगड जाती धर्मातील लोकांना विठ्ठलप्रेमाने भारुन जाति निरपेक्ष अशा अद्यात्म विचारांची मुहूर्तमेढ रोविलेली आहे असे सिध्द होते.

**प्रस्तावना :**

'भरतखंडी नरदेह प्राप्ती । ही तर परम्भाग्याची संपत्ती ।।' असे संतवचन संतसाहित्यातून आलेले आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. वीरत्व आणि वैराग्याच्या परंपरा येथे एकत्र नांदल्या. त्यातून एक भव्यदिव्य काहीस पौराणिक काळाच चित्र डोळ्यासमोर उभे राहत. तत्कालिन परिस्थितील लोकजीवनाचे सुखदु:खे, अज्ञानी लोकांची नागवण, जनसामांन्याविषयी कळवळा याकरिता संतांचे अवतारकार्य झाल्याचे दिसते, 'अवतार तुम्हा धराया कारण । उद्धराया जन जडजीवा।।' किंवा बुडतं हे जन ! देखवेना डोळा येतो कळवळा म्हणोनिया। यावरुन संतसंस्कृतीचे दर्शन घडते. संतसंस्कृती फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातल्या वेगवेगळ्या प्रदेशाप्रमाणे युरोप, अरबस्थान, इराण यासारख्या जगातल्या वेगवेगळया देशातही आढळते. यापैकी आपल्याला फक्त महाराष्ट्रातील संतसंस्कृतीतील मराठी संतांच्या ऐतिहासिक कार्याची माहिती घेता येईल.



मराठीतील आद्यकवी म्हणजे 'मुकुंदराज' आणि त्यांचा 'विवेकसिंधू' या ग्रंथास प्रथम पदवी प्राप्त झालेली आहे. स्वत: मुकुंदराजांनी 'शके अकरा दाहोत्तरु । साधारण संवत्सरु। राजा शारंगधरु। राज्य करी।।' असा लेखनकालाचा उल्लेख केला असला तरी शके १११० साधारण संवत्सर येत नाही. तो शके ११०९ मध्ये येतो, कृ.पां. कुलकर्णी यांनी गतशक कालगणना पध्दतीच्या आधारे 'विवेकसिंधू' चा लेखनकाल शके ११०९ हाच निश्चित केला आहे.

वेदशास्त्राचा मतीतार्थ मिया बोलिला हा परमार्थ ।। वेदान्ताबद्दल प्रेम आणि अभिमान मुकुंदराजाच्या मनात असल्यामुळे वेदांनाच प्रमाण मानावा असा त्यांचा आग्रह आहे. आपला ग्रंथ सर्व सामान्य जनतेसाठीच असल्यामुळे मुकुंदराजांनी सगुण

भक्तीचेच निरुपण ग्रंथातून केले आहे असे दिसते.

### (१) संत ज्ञानेश्वर :

मुकुंदराजानंतर ज्ञानेश्वरांनी माय मराठीचे दालन संपन्न केले, ज्ञानेश्वर म्हणतात.

शके बाराशते बारोत्तरें। तै टीका केली ज्ञानेश्वरें।।
सच्चिदानंद बाबा आदरें। लेखकु जाहला ।।

अर्थातच शके १२१२ पासून संप्रदाय उदयास आलेला दिसतो.

नाथपरंपरा – या पंथाचे संस्थापक 'शिव' म्हणजे साक्षात शंकरच होत आदिनाथ: शिव: सर्वेषां प्रथमो नाथ:। (ततो) नाथसंप्रदाय प्रवृत्त इति नाथ संप्रदायिनो वदन्ति' यावरून या संप्रदायास नाथ संप्रदाय असे संबोधिले जाऊ लागले नाथ संप्रदाय परंपरा

'आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा। माच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य।।
मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला। गोरक्ष वोळला गहिनीप्रती ।।
गहिनीप्रसादे निवृत्तीदातार । ज्ञानदेव सार चोजविले ।।'

अशा परंपरेने चालत आलेला हया संप्रदायाची धुरा पुढे ज्ञानेश्वरांनी चालू ठेवलेली दिसते. ज्ञानदेव हे जरी परंपरेने शैव असले तरी कुलपरंपरेने वैष्णवच होते. म्हणूनच आपल्या तत्वज्ञानाच्या प्रकटनासाठी कृष्णाने सांगितलेली गीता त्यांना निवडली. यादवकालीन समाजाला नवविचारांचे दान करणारे थोर तत्वज्ञ म्हणून ज्ञानेश्वरांचे योगदान महत्वाचे ठरते. 'काव्य आणि तत्वज्ञान ही दोन टोके आपल्या असामान्य प्रतिभेमुळे त्यांनी एकत्र आणली 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' हे काव्य ग्रंथ असले तरी आशयाच्या दृष्टीने ते तत्वज्ञानाचे ग्रंथ ठरतात वैयक्तिक आणि सामाजिक नीतीचा आदर्श घालून देणारे बोधग्रंथ असेच वर्णन करावे लागेल. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी आणि हरीपाठ ही ग्रंथसंपदा निर्माण करून वैष्णव संप्रदायाचा पायाच ज्ञानदेवांनी रचलेला दिसतो. 'ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।।' असे लक्षात येते.

नाथ परंपरेत 'पिंड–ब्रम्हांड' सिध्दान्त मांडलेला आहे
'पिंड देहस्थिती। ब्रम्हांडी पसारा ।।
हरीविन सारा व्यर्थ भ्रम।।'

जे पिंडी तेच ब्रम्हांडी हे तत्व रुजविलेले दिसून येते. ज्ञानेश्वरीतील चिद्‌विलास, भव्यरूपक ज्ञानदेवांच्या प्रतिभेचा आणि व्युत्पन्नतेचा आवाका स्पष्ट करते. 'गृहस्थाश्रमु न सांडिता । कर्मरेखा नोलांडिता' हा भक्तीमार्ग आचारिता येतो, असे ज्ञानेश्वरीच्या द्वारे समाजाला सांगितलेले दिसून येते.

समाजाला एकरूप करणारे स्वधर्माची आठवण करून देणारे, स्वार्थनिरपेक्षता शिकविणारे तत्वज्ञान लोकांच्यापुढे येणे फार आवश्यक होते हे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य ज्ञानेश्वरीद्वारा घडलेले दिसून येते.

ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील संत चळवळीचे, धार्मिक प्रबोधनाचे आद्य प्रणेते ठरलेले दिसून येतात. परमार्थप्राप्तीसाठी ज्यांना भक्तीशिवाय अन्य मार्ग उपलब्ध नव्हता अशा शूद्रातिशूद्रांच्या अंतकरणात ज्ञानेश्वरप्रणीत भागवत धर्माविषयी खास आपुलकी उत्पन्न झाली.

### (२) नामदेव :

सगुण भक्तीत रमून समाजाला मानवतेची उपासना शिकवून भागवत धर्माची पताका पंढरपूर पासून पंजाबपर्यंत नेणाऱ्या नामदेवांचे व्यक्तिमत्व भाववेडे असे आहे. स्वत: नामदेव त्यांचा जन्मकालाचा परिचय देतात ''माझे जन्मपत्र बाबाजी ब्राम्हणे । लिहीले त्यांची खूण सारु ऐका।।'' या नामदेवाच्या अभंगा आधारे त्यांचा जन्म रविवार, कार्तिक शुध्द एकादशी शके ११९२ (इ.स. १२७०) या दिवशी झालेला आहे असे स्पष्ट होते. नरसी बामणी हे त्यांचे जन्मस्थळ आढळते. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' किंवा 'आम्हा सापडले वर्म करु भागवत धर्म' या उक्तीप्रमाणे अवघ्या महाराष्ट्रीय संतश्रेष्ठांनी ज्याची उज्ज्वल परंपरा पुढे चालवून महाराष्ट्रात सांस्कृतिक पुनरुत्थान घडविले त्या वारकरी संप्रदायाचा उगम 'भक्तामाजी अग्रगणी' असणाऱ्या पुंडलिक महामुनीपासून झालेला आढळतो. नामदेवांनी सुमारे अडीच हजार अभंग निर्माण केलेले आढळतात. 'शतकोटी तुझे करीन अभंग' ही त्यांची प्रतिज्ञा होती. नामदेवांच्या अभंगातून सहहृदय संवाद, नाट्यपूर्ण प्रसंग आणि प्रांजल निवेदन या गुणविशेषांमुळे कलात्मकता लाभलेली दिसून येते नामदेवांनी आत्मचरित्र पर असे ४९१ अभंग लिहिले आहेत. म्हणून एका अर्थाने ते आत्मचरित्रकार ही होते असे सिध्द होते.

### (३) तुकाराम :

तुकाराम वोल्हाबा आंबिले जन्म देहूस इ.स. १५९८ (शके १५२०) मध्ये झाला. घराण्यात पूर्वापार विठ्ठलभक्ती चालत आलेली. वयाच्या सतराव्या वर्षापासून तुकोबाच्या जीवनात आपत्ती. आई–वडील वारले भावजय वारली. थोरला भाऊ सावजी विरक्त झाला. दुकानाचे दिवाळे निघाले. दुष्काळात गुरेढोरे गेली पहिली बायको रमाबाई वारली मुलगा संतू डोळयादेखत अन्नान्न करीत मेला थोडक्यात तुकोबाच्या संसाराचा सारीपाटच उधळला. अशा उव्दिघ्न मनाला भंडारा डोंगरावर आश्रय मिळाला. तेव्हापासून तुकारामाच्या जीवनात लोकान्त सुटला एकान्त शोधला. पुढे ईश्वर चिंतनात रमल्यानंतर २३ जानेवारी १६४० रोजी (माघ शुध्द दशमी गुरुवार शके १५६१) ला त्यांना बाबाजी केशव चैतन्यांकडून 'रामकृष्ण हरी' हा गुरु मंत्रोपदेश मिळाला. यापूर्वीच 'नामदेव स्वप्नामाजी जागे केले' आणि कवित्त्वाची स्फूर्ती होवून तुकोबांनी अभंग रचना सुरु केली होती यावरुन असे सिध्द होते

''जगद्‌गुरु तुका अवतार नामयाचा ।
संप्रदाय सकलांचा येथोनिया ।।'' असे म्हटलेले आहे.

तुकोबाचे गाथा रुपाने सुमारे पाच हजार अभंग उपलब्ध असून आजही प्रत्येकाच्या अंतकरणापर्यंत जाऊन भिडण्याचे सामर्थ्य या अभंगवाणीत आहे. एकुणच 'गर्जु हरीचे पवाडे' हे तुकोबांच्या कवितेचे ध्येय आपल्या अनुभूतीतून तुकोबांनी संसाराची असारता आणि क्षणभंगुरता पटवून दिलेली आहे. संसाराची आसक्ती सोडा आणि दीनांचा सोयरा असणाऱ्या विठ्ठलाला अनन्यभावे शरण जा असे तुकोबांच्या उपदेशाचे मर्म आहे असे दिसून येते. तुकोबांचा पिंड हा भावणाप्रधान भक्ताचा त्याचबरोबर परखडसमाजसुधारकाचाही दिसून येतो.

'बुडत हे जन देखवे ना डोळा।
येतो हिताचा कळवळा म्हणोनिया।।'

अशा कळवळया पोटी समाजाला उध्दाराचा मार्ग दाखवितात असे ऐतिहासिक कार्य त्यांच्या कार्यकर्तृत्वातून सिध्द होते.

### (४) एकनाथ :

नाथांचा जन्मकाळ (शके १४५०) इ.स. १५२८ ते मृत्युकाळ (शके १५२१) इ.स. १५९९ असा कालखंड नाथांचा आहे. नाथांचे गुरु जनार्दन स्वामीकडून नाथांवर अनुग्रह झालेला आहे. हिंदू समाज व्यवस्थेतील विषमता आणि अज्ञानही दूर करण्याकरीता भागवत ग्रंथाची निर्मिती झालेली दिसून येते. पंडीत आणि विव्दानांसाठी चतु:श्लोकी भागवत आणि एकनाथी भागवताचे लिखाण केले. समाजातील सर्वसामान्य असा जो तळया वर्ग होता त्यासाठी भारुडाची निर्मिती केली. भागवत धर्माचे तत्वज्ञान नाथांनी मराठीत आणले.

भागवतात नाथांनी जन तोचि जनार्दन आणि आणि 'लोकसंग्रह या तत्वांवर भर दिलेला दिसून येतो. सुमारे ३०० भारुडे एकशे पंचवीस विषयांवर रचलेली दिसतात. या रचनेशिवाय विठ्ठलवर्णन नाममाहात्म्य पंढरीमाहात्म्य भागवत संप्रदायाची तत्वे मुमुक्षूंना उपदेश केलेला आढळतो. विशेषत: दत्त दत्त ऐसे लागे ध्यान। हारपले मन झाले उन्मन ही नाथकृत आरतीही प्रसिध्द आहे असे ऐतिहासिक कार्य नाथांचे उल्लेखनिय आहे.

### (५) गोरा कुंभार :– (इ.स. १२६७ – १३०९/श. ११८९–१२३१)

'ज्ञानदेव–नामदेवांच्या भोवती असलेल्या प्रभावळीत गोरोबा काकांचे स्थान फार वरचे आहे परमार्थात अधिकार, अनुभवाचा साठा होता ते म्हणतात 'गोरा जुनाट पै जुना । हाती थापटणे अनुभवाचे' असे नामदेवांनी गौरोद्‌गार काढले आहेत.

म्हणे गोरा कुंभार 'विठ्ठलमंत्र सोपा । एक वेळा बापा उच्चारी रे' असा नामाचा महिमा त्यांनी आपल्या अभंगातून सांगितला आहे. 'रुपाचे दर्पण रुपेविण पाहिला' या ज्ञानदेवाचा अनुभवाप्रमाणेच 'तत्वमासि'चा अनुभव गोरोबांनी आलेला दिसून येतो. गोरोबांच्या अभंगातून संपन्न आणि सात्विक असा ज्ञानानुभव साठविला आहे.

### (६) सावता माळी :

आपल्या व्यवसायात विठ्ठल पाहणारे सावतोबा हे निष्टावंत भक्त होते त्यांनी आपल्या 'सकलसंतगाथा' मध्ये त्यांचे फक्त १२ अभंग उपलब्ध आहेत. सावता सागर प्रेमाचा आगर' असा नामदेवांनी त्यांचा उल्लेख केलेला आहे.

'कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी'

**किंवा**

'आमची माळियाची जात शेत लावू बागाईत।।'

असे म्हणणारे सावता महाराज व्यवसाय व व्यवसायात देव पाहतात, तर दुसरीकडे 'नामाचिचे बळे न भिऊ सर्वथा । कळीकाळाच्या माथा सोटे मारु' अशा शब्दात नामाचे सामर्थ्य ही सांगतांना दिसतात. यावरुन तत्कालीन सामाजिक, धार्मिक स्थितीतील विषमता स्पष्ट होते.

## (७) नरहरी सोनार :

सावता महाराजांप्रमाणे यांनीही आपला व्यवसायात विठ्ठल शोधलेला दिसतो. प्रारंभी कट्टर शैव असलेले नरहरी सोनार ज्ञानदेवाच्या सहवासात विष्णुदास झालेले दिसतात. 'देह बागेसरी जाणे । अंतरात्मा जाण सोने।।' या अभंगातून नरजन्म, नरदेहाचा उध्दार संतसेवेत आहे असे लक्षात येते. साधारणत: एकुण चौतीस अभंग 'सकलसंतगाथ्यात' त्यांच्या नावावर आढळतात. त्यात 'नाम फुकाचे फुकाचे । देवा पंढरीरायाचे' हा नाममाहात्म्य सांगणारा त्यांचा अभंग आज ही लोकप्रिय ठरलेला आहे.

## (८) चोखामेळा :

नामदेवांच्या समकालीन चोखामेळा हे मंगळवेढ्याचे राहणारे संत होवून गेले. घरात विठ्ठल भक्तीची परंपरा हीनयातिमुळे मिळणारी बोचक वागणूक वारकरी संप्रदायात त्यांना मिळाली नाही. संत नामदेवाचे शिष्य नामदेवाच्या कीर्तनामुळे ते हरिनामाशी एकरुप झाले. आपल्या अभंगातून सामाजिक उपेक्षेची 'वेदना' व्यक्त करणारे चोखोबा हे मराठीतील पहिले कवी. 'उस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा' असा भावोत्कर अनुभव ते आपल्या अभंगातून उमटवितात, सुमारे ३४९ अभंगाची नोंद त्यांच्या सकलसंतगाथ्यात त्यांच्या नावावर आहे. एकूणच त्यांच्या अभंगातून अनुभवांची कक्षा चोखोबांच्या कवितेने रुंदावली हे तिचे महत्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

## (९) सेना न्हावी :

सेना न्हावी हे मुळचे जबलपूरजवळ बांदुगडचे राहणारे तीर्थाटन करता करता ते महाराष्ट्रात येऊन गेले. 'जाता पंढरीसी सुख वाटे जीवा। आनंदे केशवा भेटताचि ।।' हा आनंद त्यांच्या वाणीतून प्रकट झालेला दिसतो.

'घेता नाम विठोबाचे । पर्वत जळती पापांचे हा त्यांचा अभंग त्याचबरोबर 'आम्ही वारीक वारीक' करू हजामत बारीक हा त्यांच्या व्यवसायातील अभंग सुप्रसिध्द आहे.

असे परब्रम्हाची जाण करून देणारा ध्वनी त्यांचा उल्लेखनीय आहे असे लक्षात येते.

## (१०) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज :

हे द्रष्टे संत होते. आपल्याला लाभलेल्या जीवनाचे कल्याण सर्वांनी कस करावं, याचा ध्यास या महापुरुषाच्या मनाला सतत लागलेला होता. तुकडोजींनी आपल्या 'ग्रामगीतेतून केवळ लेखनच केले नाही तर आपल्या कृतीतून सिध्द केलेले आहे. व्यक्ती कुटूंब—समाज—ग्राम—देश आणि संपूर्ण विश्व कल्याणाचा संदेश म्हणजे ग्रामगीता होय. ग्रामव्यवसाय ग्रामसुरक्षा, ग्रामप्रतिनिधित्व ग्रामसंघटन इ. किती तरी अंगाचा विचार त्यांनी ग्रामगीतेत केलेला आढळतो. सर्व प्राणीमात्रांच्या कल्याणाची वैश्विक कामना असते हे ग्रामगीतेतून सिद्ध होते.

राष्ट्रसंतांनी जगासाठी सर्वसामान्यांसाठी ऐतिहासिक आणि मोलाचे योगदान दिलेले दिसते.

## निष्कर्ष :

१. शास्त्रप्रामाण्य व समाजातील जातिव्यवस्था यांना मुळीच धक्का न लावता स्त्री व शूद्रातिशूद्रांना समाविष्ट करुन त्यांच्या आत्मविकासाला त्यांनी वाट करून दिलेली आहे.
२. ईश्वरप्राप्तीचा खरा मार्ग दाखविण्याच्या प्रयत्न केलेला दिसतो असे लक्षात येते.
३. मराठी सारस्वतात संतांचे एकुणच कार्य वाखाणन्याजोगं आहे असे सिद्ध होते.
४. संतांच्या वाङ्मयातील आर्तभाव व परखडपणा, चोखंदळपणा याचे सखोल व यथार्थ दर्शन घडते.
५. भागवत धर्माची तळमळ, आंतरिक प्रेमानुभूती व अद्यात्मविद्येचे रुपसौंदर्य मराठी संतांच्या कार्यातून प्रकटलेले सिध्द होते.

## संदर्भसूची

१. 'प्राचिन मराठी वाङ्मयाचा इतिहास' — लेखक ल. रा. नसिराबादकर
२. 'संतसाहित्य एक नवचिंतन' — लेखक डॉ. यू. म. पठाण

३. 'तुकाराम दर्शन' – लेखक डॉ. सदानंद मोरे
४. आठव ज्ञानदेवाचा, ज्ञानदेवीचा' – लेखक डॉ. यू. म. पठाण
५. 'ज्ञानेश्वरी १२ वा अध्याय' – लेखक डॉ. मदन कुलकर्णी